| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHRT140001012025 | दाखल दिनांक | :- | २२/०१/२०२६ | | |
| | नोंदणी दिनांक | :- | २२/०१/२०२६ | | |
| | निकाल दिनांक | :- | **१३/०८/२०२६** | | |
| | कालावधी | :- | वर्षे | महिने | दिवस |
| | | | ०० | ०६ | २२ |

**भाग 'अ'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i) )**

**मंडणगड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**
**[अमृता चा. जोशी, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचेसमोर]**
**[जाहीर दिनांक १३/०८/२०२६]**

**निशाणी क्र.०७ लगत**

| | |
|---|---|
| खटला क्रमांक :- | **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१८/२०२६** |
| गुन्हा रजि. क्रमांक व पोलीस ठाणे :- | **गुन्हा रजि. क्र.२००/२०२५,**<br>**राज्य उत्पादन शुल्क, खेड विभाग, जि. रत्नागिरी.** |
| फिर्यादी :- | **महाराष्ट्र शासन करीता**<br>**निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, खेड विभाग,**<br>**जि. रत्नागिरी.** |
| प्रतिनिधीत्व:- | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. बी. नाईक.** |
| आरोपी:- | **अनंत जगन्नाथ पुसाळकर,**<br>वय - ६३ वर्षे, व्यवसाय - शेती,<br>रा. मु. वाल्मीकीनगर, पो. वेसवी,<br>ता. मंडणगड, जि. रत्नागिरी. |
| प्रतिनिधीत्व :- | **विधिज्ञ श्री. डी. एम. कांबळे** |

**- भाग 'ब' -**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii) )**

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | ०५/१०/२०२५ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झालेचा दिनांक | ०५/१०/२०२५ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | २२/०१/२०२६ |

| | |
|---|---|
| आरोपीविरुध्द अपराधाचा तपशील ठेवलेचा दिनांक | ०८/०४/२०२६ |
| पुरावा नोंदविणेस प्रारंभ झालेचा दिनांक | १८/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा आरक्षीत दिनांक | लागू नाही. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | **१३/०८/२०२६** |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाचा दिनांक | लागू नाही. |

**<u>आरोपीचा तपशील</u>**

| आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर खुले केलेची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | भा.ना.सु.सं. क. ४६८ अन्वये स्थानबध्दता भोगलेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| अनंत जगन्नाथ पुसाळकर | भा.ना.सु.सं.क. ३५(३) नुसार आरोपीस नोटीस दिलेने आरोपीस अटक नाही. | लागू नाही. | महाराष्ट्र दारुबंदी अधि. कलम ६५(ई) | निर्दोष मुक्त केले. | लागु नाही | लागु नाही. |

**<u>'भाग–क'</u>**

**<u>(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii) )</u>**

**<u>साक्षीदारांची यादी</u>**

**अ. सरकारी**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | सतीश शरद भाटकर | **पंच** | ०७ लगत |
| अ.सा.क्र.२ | निलेश सदानंद कोंबेकर | **पंच** | ०७ लगत |
| अ.सा.क्र.३ | राहुल प्रभू नायकवडी | **फिर्यादी** | ०७ लगत |
| अ.सा.क्र.४ | सुनिल राजेंद्र वाघमारे | **नमुना वाहक** | ०७ लगत |

**ब. बचावाचे साक्षीदार – नाही.**

**क. न्यायालयीन साक्षीदार – नाही.**

## सरकारी / बचाव / न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

**अ. सरकारी –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| **१** | पी.नि.क्र.१६/अ.सा.क्र.०३ | **फिर्याद** |
| **२** | पी.नि.क्र.१७/अ.सा.क्र.०४ | **अहवाल** |

**ब. बचाव– नाही.**

**क. न्यायालयीन निशाण्या– नाही.**

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | सुमारे ३५ लीटर मापाचे दोन कॅन गावठी हातभट्टी दारूने पूर्ण भरलेले, सुमारे २० लीटर मापाचा एक कॅन गावठी हातभट्टी दारूने पूर्ण भरलेले, एक प्लॅस्टीक बादली व दोन प्लॅस्टीक मग |

**: : न्या य नि र्ण य : :**

**(घोषित दिनांक : १३ ऑगस्ट, २०२६)**

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५(ई) अन्वये दाखल करणेत आलेला आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :**

२. दि.०५/१०/२०२५ रोजी राहुल प्रभू नायकवडी, जवान, राज्य उत्पादन शुल्क, खेड विभाग, जि. रत्नागिरी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून ते, दुय्यम निरीक्षक व इतर कार्यालयीन कर्मचारी यांचेसोबत मौजे वाल्मीकीनगर, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी येथील आरोपीचे राहते घराचे मागील पडवीत छापा टाकला असता आरोपी हा त्याचे ताब्यात सुमारे ३५ लीटर मापाचे दोन कॅन गावठी हातभट्टी

दारूने पूर्ण भरलेले, सुमारे २० लीटर मापाचा एक कॅन गावठी हातभट्टी दारूने पूर्ण भरलेले, एक प्लॅस्टीक बादली व दोन प्लॅस्टीक मग हा मुद्देमाल चोरटा दारु विक्रीचा व्यवसाय करणेच्या उद्देशाने बाळगलेल्या अवस्थेत मिळून आला. त्यानंतर त्यांनी त्या मुद्देमालापैकी १८० मिली मापाच्या दोन बाटल्यांमध्ये दारू रासायनिक पृथ:क्करणासाठी नमुनाकामी घेऊन त्यावर पंचांच्या सह्यांचे लेबल लावून सविस्तर पंचनामा केला. त्यानंतर सरकारतर्फे जवान नायकवडी यांनी आरोपीविरुध्द फिर्याद नोंदवली.

३. दाखल फिर्यादवरुन गुन्हा नोंद क्र.२००/२०२५ नोंद करणेत आला. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. नमुन्याकामी काढलेली बाटली रासायनिक पृथःकरणासाठी प्रयोगशाळेत पाठविणेत आली. तसेच तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५(ई) अन्वये दोषारोप ठेवणेत आला. आरोपीला निशाणी क्र.०७ वर अपराधाचा तपशील समजावून सांगितला. वरील निवेदनाप्रमाणे त्याने गुन्हा कबुल न करता प्रकरण चालविणेचे स्विकारले. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आला असल्यामुळे त्याचा भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे जबाब (नि.०७ लगत) नोंदविणेत आला.

५. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करणेसाठी पंच साक्षीदार सतीश (अ.सा.क्र.०१), निलेश (अ.सा.क्र.०२), फिर्यादी नायकवडी (अ.सा.क्र.०३) आणि नमुना वाहक वाघमारे (अ.सा.क्र.०४) यांना तपासणेत आले. याउलट, आरोपीच्या वतीने कोणताही पुरावा दाखल करणेत आला नाही.

६. अभियोग पक्षाची कथने व आरोपीचा बचाव पाहता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांचे निष्कर्ष त्यावरील कारणमिमांसेसह खालीलप्रमाणेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०५/१०/२०२५ रोजी मौजे वाल्मीकीनगर, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी येथील आरोपीचे राहते घराचे मागील पडवीत आरोपी हा त्याचे कब्जात विनापरवाना बेकायदेशीररित्या "सुमारे ३५ लीटर मापाचे दोन कॅन गावठी हातभट्टी दारूने पूर्ण भरलेले, सुमारे २० लीटर मापाचा एक कॅन गावठी हातभट्टी दारूने पूर्ण भरलेले, एक प्लॅस्टीक बादली व दोन प्लॅस्टीक मग" चा मुद्देमाल चोरटा गावठी हातभट्टी दारू विक्रीचा व्यवसाय करणेच्या उद्देशाने बाळगलेल्या अवस्थेत मिळून आला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **...नकारार्थी** |
| २. | काय आदेश ? | **...अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :**

७. आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. डी. एम. कांबळे व अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. बी. नाईक यांनी गुणदोषांवर न्यायनिर्णय करणेबाबत युक्तीवाद केला.

८. अभियोग पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करणेसाठी पंच साक्षीदार, फिर्यादी आणि नमुना वाहक यांना तपासणेत आले.

**९.** सतीश (अ.सा.क्र.०१) व निलेश (अ.सा.क्र.०२) या दोन्ही साक्षीदारांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले की, दि.०५/१०/२०२५ रोजी पोलीसांनी त्यांना बोलावून त्यांची एका कागदावरती सही घेतली होती. पंचनाम्यामध्ये काय लिहिले ते त्यांना वाचून दाखविले नव्हते तसेच वाचण्यास दिले नाही. सदर दोन्ही साक्षीदारांनी पुढे असे कथन केले की, त्यांचे समक्ष पोलीसांनी काही कारवाई केली नव्हती. सदर दोन्ही साक्षीदारांनी त्यांची पंचनाम्यावरील सही ओळखली परंतु त्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली आहे. दोन्ही पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास पाठींबा दिला नाही. म्हणून सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतु त्यातून अभियोग पक्षाला मदत होईल असे काहीही निष्पन्न झाले नाही.

**१०.** अभियोग पक्षातर्फे तपासणेत आलेले फिर्यादी साक्षीदार क्र.३ नायकवडी यांनी त्यांचे पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक ०५/१०/२०२५ रोजी गुप्त बातमीच्या आधारे साक्षीदार दोन पंचांसह मौजे वेसवी वाल्मीकीनगर येथे आरोपी अनंत जगन्नाथ पुसाळकर याच्या राहत्या घराच्या मागील पडवीत छापा टाकला असता, तेथे ३५ लीटरचे दोन व २० लीटरचा एक असे गावठी हातभट्टी दारूचे कॅन मिळून आले. मुद्देमाल जप्त करून १८० मिली दारू रासायनिक प्रत्यंतरणासाठी सीलबंद करण्यात आली. पंचनामा करून आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली व आरोपीला भा.ना.सु.सं.क. कलम ३५(३) अन्वये नोटीस देऊन सोडण्यात आले. सदर साक्षीदाराने त्याचे पुराव्यात फिर्याद (नि.१६) ओळखली आहे.

**११.** सदर साक्षीदाराने त्याचे उलटतपासादरम्यान असे कथन केले आहे की, खेड ते वाल्मीकीनगर हे अंतर सुमारे १०० किमी असून ते खेड येथून किती वाजता निघाले व वाल्मीकीनगर येथे किती वाजता पोहोचले हे त्याने फिर्याद देताना नमूद केलेले नाही. बातमीची खात्री करणेसाठी घटनास्थळावरती तोतया ग्राहक पाठविला

नव्हता. आरोपीचे घराचा घर क्रमांक व घटनास्थळाचा सर्व्हे क्रमांक त्याने फिर्यादमध्ये नमूद केलेला नाही.

**१२.** अभियोग पक्षातर्फे तपासणेत आले साक्षीदार क्र.४ वाघमारे यांनी त्यांचेपुराव्यात असे कथन केले आहे की, दि.३०/१०/२०२५ रोजी त्यांचेकडे गु.र.क्र.२००/२०२५ मध्ये गावठी हातभट्टी दारूची १८० मिली मापाची दु.निरीक्षक यांनी दिली. दि.३१/१०/२०२५ रोजी त्यांनी सदर बाटली न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, कोल्हापूर येथे अहवालासह जमा केली. तसा मुद्देमाल पोहोच केलेबाबत जबाब पोलीस ठाण्यात दाखल केला. सदर साक्षीदारोन त्याचे पुराव्यात अहवाल (नि.१७) दाखल केला.

**१३.** सदर साक्षीदाराने त्याचे उलटतपासादरम्यान असे कथन केले आहे की, नमुना बाटली ताब्यात घेताना आणि सदर बाटली न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेत जमा करताना त्याचा स्वतंत्र पंचनामा केला नाही. तसेच कोल्हापूर येथे प्रवास केलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा तपासिक अंमलदार यांना दिलेला नाही.

**१४.** प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने आरोपीच्या कब्जात विनापरवाना गावठी हातभट्टी दारु मिळून आली हे निःसंशयपणे सिध्द करणे आवश्यक आहे.

**१५.** प्रस्तुत प्रकरणात सतीश (अ.सा.क्र.०१) व निलेश (अ.सा.क्र.०२) या दोन्ही पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास पाठींबा न दिल्याने अभियोग पक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करणेस असमर्थ ठरला. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून जप्त केला हे सिध्द झालेले नाही.

**१६.** फिर्यादी नायकवडी (अ.सा.क्र.०३) यांनी त्यांचे पुराव्यात, आरोपी वरती छापा टाकला असता तो घटनास्थळावरती दारू विक्री करीत असलेचे मिळून आलेचे कथन केले आहे. त्यांच्या उलटतपासामध्ये आलेप्रमाणे, बातमीची खात्री करणेसाठी त्याने तोतया ग्राहक घटनास्थळी पाठविलेला नव्हता. सबब, आरोपी बेकायदेशीररित्या दारूविक्री करीत होता याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावरती नाही.

**१७.** नमुना वाहक वाघमारे (अ.सा.क्र.०४) यांनी प्रस्तुत प्रकरणातील नमुना अहवालासह कोल्हापूर येथे जमा केला व तसा जबाब पोलीस ठाण्यात दाखल केलेचे कथन केले आहे. सदर सक्षीदाराने त्याचे उलटतपासामध्ये असे कथन केले आहे की, नमुना बाटली ताब्यात घेताना आणि न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेत जमा करताना त्याचा स्वतंत्र पंचनामा केला नाही. सबब, सदर नमुन्याबाबत छेडछाड झालेची शक्यता नाकारता येत नाही.

**१८.** महत्त्वाची बाब अशी की, प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे रासायनिक विश्लेषण अहवाल दाखल करणेत आलेला नाही. सबब, आरोपीचे ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल हा दारू असलेचा सबळ पुरावा अभिलेखावर नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात तपासिक अंमलदार यांना देखिल तपासलेले नाही. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन करता प्रस्तुत प्रकरणात आरोपीला दोषी ठरविणेइतपत सबळ पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. म्हणून मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देणेत येत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :**

**१९.** मुद्दा क्र. १ च्या निष्कर्षाचा विचार करीता अभियोग पक्ष आरोपीवर ठेवलेला दोषारोप ठोस पुराव्यानिशी व संशयापलीकडे जाऊन सिध्द करणेस अपयशी

ठरला आहे. त्यामुळे वरील सर्व पुराव्याच्या विश्लेषणावरुन आरोपी सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

## आ दे श

१. **आरोपी अनंत जगन्नाथ पुसाळकर** याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५(ई) या दंडनीय गुन्ह्यातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करणेत येते.

२. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल अपील कालावधी संपुष्टात आल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी यांचेकडे नियमाप्रमाणे विल्हेवाटीकामी व योग्य कार्यवाहीस्तव पाठविणेत यावा.

३. आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करणेत येत आहे.

४. आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ४८१ प्रमाणे रक्कम रूपये २५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका व जामिनकदबा देऊन पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करणेत आला.)

AMRUTA CHARUDATTA JOSHI
Digitally signed by AMRUTA CHARUDATTA JOSHI
Date: 2026.08.13 17:53:05 +0530

**ठिकाण – मंडणगड.**
**दिनांक – १३/०८/२०२६**

**(अमृता चा. जोशी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंडणगड.**

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order. | | |
| Court Name | :- | Civil Judge, J.D. & J.M.F.C., Mandangad, Taluka Mandangad, District- Ratnagiri. |
| Name of Stenographer | :- | Shri. A. J. Sagvekar |
| Date of Decision | :- | 13/08/2026 |
| Judgment/order signed by P.O. on | :- | 13/08/2026 |
| Judgment/order uploaded on | :- | 13/08/2026 |